**प्रेसनोट दि. १४.०५.२०२४**

लोकसेवक श्री. तानाजी शामराव पवार वय ५२ वर्षे, मंडल अधिकारी, पलूस रा. पवार गल्ली, कनेगांव ता. वाळवा, जि. सांगली व खाजगी इसम प्रसाद गजानन चव्हाण वय ५४ वर्षे, रा. आमणापुर रोड, दक्षिण बाजू वार्ड नं. ५ बुर्ली, ता. पलूस जि. सांगली यांना ७५००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे मित्राने खरेदी केलेल्या जमीनीची तलाठी पलूस यांनी धरलेली नोंद मंजुर करण्यासाठी लोकसेवक श्री. तानाजी शामराव पवार मंडल अधिकारी पलूस व त्यांचे हाताखाली मदतनीस म्हणुन काम करणारे खाजगी इसम प्रसाद गजानन चव्हाण यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रूपये लाच मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १४.०५.२०२४ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता मंडल अधिकारी श्री तानाजी पवार यांचे हाताखाली मदतनीस म्हणुन काम करणारे खाजगी इसम प्रसाद गजानन चव्हाण यांनी तक्रारदार यांचे मित्राने खरेदी केलेल्या जमीनीची तलाठी पलूस यांनी धरलेली नोंद मंडल अधिकारी यांना सांगुन मंजुर करण्यासाठी स्वतःकरीता व मंडल अधिकारी श्री तानाजी पवार यांचेकरीता १००००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ७५००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.१४.०५.२०२४ रोजी तहसिल कार्यालय, पलूस या ठिकाणी सापळा लावला असता मंडल अधिकारी श्री तानाजी पवार यांचे हाताखाली मदतनीस म्हणुन काम करणारे खाजगी इसम प्रसाद गजानन चव्हाण यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ७५००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे व खाजगी इसम प्रसाद चव्हाण यांचे लाच स्विकृतीस मंडल अधिकारी तानाजी पवार यांनी प्रोत्साहन दिले असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री. तानाजी शामराव पवार, मंडल अधिकारी, पलूस रा. पवार गल्ली, कनेगांव ता. वाळवा, जि. सांगली व खाजगी इसम प्रसाद गजानन चव्हाण, रा. आमणापुर रोड, दक्षिण बाजू वार्ड नं. ५ बुर्ली, ता. पलूस जि. सांगली यांचेविरुध्द पलूस पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. विजय चौधरी सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदीप पाटील, पोलीस उप अधीक्षक, पोलीस निरीक्षक, श्री. दत्तात्रय पुजारी, पोलीस निरीक्षक श्री. विनायक भिलारे, पोलीस अंमलदार प्रितम चौगुले, अजित पाटील, राधीका माने, ऋषीकेष बडणीकर, सलीम मकानदार धनंजय खाडे, चंद्रकांत जाधव, उमेश जाधव, अतुल मोरे, सीमा माने, सुदर्शन पाटील, रामहरी वाघमोडे, चालक वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर व मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net
२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB
३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सत्यमेव जयते

(संदीप पाटील)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner